सन २००४ मध्ये सहायक नियंत्रक, वैध मापन शास्त्र या पदावर दिलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीस मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक - वैमाशा-२०१९/२१५/प्र. क्र.५८/ग्रासं-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक - १८ जुलै, २०१९

वाचा - १. शासन निर्णय,क्रमांक: वैमाशा-१००३/प्र.क्र.६१४/ ना.पु.१४, दि.२१.०८.२००४.

२. नियंत्रक,वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे जा.क्र.वैमाशा/ आस्था/ सहा.नियं/ विकेआ/सेसा/२०१९/९०५, दि.२२.०४.२०१९ चे पत्र.

शासन निर्णय :-

उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील वैध मापन शास्त्र यंत्रणेतील सहायक नियंत्रक,गट ब या संवर्गात रिक्त असलेल्या पदावर त्या यंत्रणेतील निवडश्रेणी निरीक्षक,गट ब या संवर्गातील श्री.वि.के.आवणकर यांना ११ महिन्यांकरीता तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेली होती. सदर तात्पुरत्या पदोन्नतीचा कालावधी दि.२१.०७.२००५ रोजी समाप्त झाला आहे.

२. श्री.आवणकर हे दि.२१.०८.२००४ पासून सहायक नियंत्रक याच पदावर कार्यरत असले तरी त्यांच्या पदोन्नतीस मुदतवाढ दिलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांचे दि.०१.०३.२०१९ रोजी निधन झाले आहे. श्री.आवणकर यांच्या पदोन्नतीस मुदतवाढ किंवा नियमित पदोन्नतीचे आदेश काढले नसले तरीही त्यांना पदावनतसुध्दा करण्यात आलेले नाही. यास्तव श्री.वि.के.आवणकर यांच्या पदोन्नतीस दि.२०/०७/२००५ पासून त्यांच्या मृत्यूदिनांकापर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यांना पदोन्नतीचा नियमित दिनांक सामान्य प्रशासन विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल.

३. सदर प्रकरणी मूळ पदोन्नतीच्या आदेशातील इतर अटी व शर्ती कायम रहातील.

४. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अनौ.सं.क्र.६३७/कार्या.१२, दि.२६.०६.२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०७१९१५२३४९४६०६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SURESH DNYANDEO REDEKAR

Digitally signed by SURESH DNYANDEO REDEKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=00b6deeb0e386eb5698cc129016108429cd770a158e87c3a2a96134dccfff610, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=b0c49d4a2d63d7827dd22b5ccbfc134f691b42353bcee54455b220aff75b429c, ou=FOOD SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SURESH DNYANDEO REDEKAR
Date: 2019.07.19 15:32:19 +05'30'

(सु.ज्ञा.रेडेकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२) महालेखापाल -१/२ (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई

३) महालेखापाल -१/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद
६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
७) मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) निवड नस्ती , कार्यासन ग्रासं-३